डोंबिवली नागरी सहकारी बँक लि.
DNS BANK (मल्टी-स्टेट शेड्यूल्ड बँक)

# डोंबिवली नागरी सहकारी बँक लि. (मल्टी स्टेट शेड्यूल्ड बँक)

नोंदणी क्र.- टी.एन.ए./ बी.एन. के./ 127, दिनांक 04 जुलै 1970
नोंदणी क्र.-एम.एस.सी.एस./ सी.आर./ 1275/ 2017, दिनांक 28 जुलै 2017
भारतीय रिझर्व्ह बँक लायसन्स -एसीडी. एमएच.- 227 (पी) दिनांक 09-10-1980
मधुकुंज, प्लॉट क्र. पी-52, एम.आय.डी.सी. फेज-2, सोनारपाडा, कल्याण-शिळ रोड, डोंबिवली (पूर्व)- 421 204.

## 55 व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

या सूचनेद्वारे सर्व 'सर्वसाधारण सभासदांना (Ordinary Members)" कळविण्यात येते की, बँकेची 55 वी वार्षिक सर्वसाधारण सभा गुरुवार, दि. 19 जून 2025 रोजी, सकाळी ठीक 10.00 वाजता, श्री गणराज बँक्वेट, तिसरा मजला, ज्येष्ठ नागरीक मंडळाचे शेजारी, एमआयडीसी सर्व्हिस रोड, डोंबिवली (पूर्व)-421 203 येथे पुढील कामकाजाचा विचार करण्यासाठी आयोजित केली आहे. तरी सर्व सभासदांनी कृपया वेळेवर उपस्थित रहावे ही विनंती.

### सभेपुढील कामकाजाचे विषय -

1) संचालक मंडळाने सादर केलेला दि. 31-03-2025 अखेरच्या वर्षाचा अहवाल, ताळेबंद व नफा-तोटा पत्रक तसेच नफा वाटणी मंजूर करणे आणि वैधानिक लेखापरीक्षकांच्या अहवालाची नोंद घेणे.
2) सन 2023-24 या आर्थिक वर्षाचा दोष दुरुस्ती अहवाल (Compliance Report) सादर करण्यात आल्याची नोंद घेणे.
3) बँकेचे आर्थिक वर्ष 2025-26 करीताच्या अंदाजपत्रकास मंजूरी देणे.
4) संचालक मंडळाने आर्थिक वर्ष 2025-26 साठी मंजूर केलेली वार्षिक योजना (Annual Operational Plan) सभेपुढे सादर करणे.
5) बँकेचे संचालक तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या बँकेत कार्यरत असलेल्या नातेवाईकांबाबत माहिती घेणे.
6) बँकेने सुचविलेल्या पोटनियम दुरुस्तीस मान्यता देणे.
7) बँकेच्या संचालकांनी तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी रिझर्व्ह बँकेच्या मास्टर सर्क्युलरमधील सूचनांचा अंगीकार केला असल्याची नोंद घेणे.
8) दि. 31 मार्च 2025 अखेर संचालकांना व त्यांच्या कुटुंबियांना (केवळ त्यांच्या स्वतःच्या मुदत ठेवींच्या तारणावर) दिलेल्या कर्जांच्या तपशीलाची नोंद घेणे.
9) 2026-27 या आर्थिक वर्षासाठी वैधानिक लेखापरीक्षक नेमण्याचे व त्यांचे सेवा शुल्क ठरविण्याचे वार्षिक सर्वसाधारण सभेचे अधिकार, संचालक मंडळास देणे.
10) बँकेचे निधी / तरतुदी (Reserves/ Provisions) अन्य आवश्यक अशा खात्यांमध्ये वा नफा-तोटा खात्यांमध्ये वर्ग करण्याचे अधिकार संचालक मंडळास देणे.
11) आर्थिक वर्ष 2024-25 मध्ये सवलत देऊन बंद केलेल्या खात्यांबाबतच्या सांख्यकीय माहितीची नोंद घेणे.
12) बँकेचे कार्यक्षेत्र गोवा, कर्नाटक आणि गुजरात राज्यात वाढविण्याबाबतच्या प्रस्तावास मंजूरी देणे.
13) अनुपस्थितीबाबत कळविणा-या सभासदांच्या रजा मंजूर करणे.
14) मा. अध्यक्षांच्या अनुमतीने, आयत्यावेळी येणा-या विषयांचा विचार करणे.

संचालक मंडळाच्या आदेशानुसार,
सौ. सु. अ. पाटील,
प्रभारी सरव्यवस्थापक

दिनांक - 31 मे, 2025

टीप - 1) गणसंख्येच्या अभावी सभा स्थगित झाल्यास अशी स्थगित झालेली सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर म्हणजे सकाळी 10.30 वाजता भरेल. त्या सभेस गणसंख्येचे बंधन असणार नाही..
2) सभेचे कामकाज व्यवस्थित पार पाडता यावे या दृष्टीने, ज्या सभासदांना काही सूचना मांडावयाच्या असतील अगर हिशेब विषयक अन्य माहिती विचारावयाची असेल, त्यांनी कृपया दि. 13 जून, 2025 पर्यंत प्रभारी सरव्यवस्थापकांकडे लेखी विचारणा करावी, म्हणजे माहिती देणे शक्य होईल.
3) बँकेचा 2024-25 चा वार्षिक अहवाल बँकेची वेबसाईट www.dnsbank.in येथे दि. 04 जून, 2025 पासून उपलब्ध राहील. अहवालाची छापील प्रत दि. 13 जून, 2025 पासून बँकेच्या सर्व शाखांमध्ये उपलब्ध असेल.